Vol 6 Issue 9 October 2016

ISSN No : 2230-7850

International Multidisciplinary Research Journal

# Indian Streams Research Journal

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Dr. T. Manichander

Mr. Dikonda Govardhan Krushanahari
Professor and Researcher ,
Rayat shikshan sanstha's, Rajarshi Chhatrapati Shahu College, Kolhapur.

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University


**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.org**

ISSN: 2230-7850 Impact Factor :4.1625(UIF) Volume - 6 | Issue - 9 | October - 2016

Indian Streams Research Journal

# 'बलुतं' या आत्मकथनावरील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा प्रभाव

प्रा. डॉ. शकील शेख
प्रमुख, मराठी विभाग, सौ. सुवर्णलता गांधी महाविद्यालय, वैराग,
ता. बार्शी, जि. सोलापूर,



**प्रस्तावना :**

स्वातञ्योत्तर कालखंडात देशात शिक्षण क्षेत्रात महत्त्वपूर्ण क्रांती झाली. शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार ग्रामीण भागापर्यंत जाऊन पोहचला आणि त्यातून ग्रामीण भागातील गावकुसाच्या आतील व गावकुसा बाहेरील सर्वच तरूण शिक्षण घेऊन पुढे आले. या शिकलेल्या तरूण पिढीने साहित्याची अनेकांगे निर्मिती केली. यातून मराठी साहित्यात एक चळवळ निर्माण झाली. या चळवळीतून मराठी साहित्यात विविध साहित्य प्रकार अस्तित्वात आले. १९६० नंतर अस्तित्वात आलेला एक ठळक साहित्य प्रकार म्हणून दलित साहित्याकडे पाहिले जाते. दलित साहित्यात दलित कविता आणि दलित आत्मकथनाच्या माध्यमातून दलितांची अस्मिता, त्यांनी व्यवस्थेविरूध्द पुकारलेला संघर्षाचा आवाज मोठ्याा प्रमाणात शब्दबध्द झाला. अक्षरांच्या दुनियेत नव्यानेच प्रवास करणारा हा समाज, या समाजाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्यामुळे आत्मभान आले होते. या आत्मभानामुळेच ते आपले जगणे शब्दबध्द करू लागले होते.

दलित साहित्यिकांच्या आत्मभाना संदर्भात डॉ. वासुदेव मुलाटे म्हणतात, "या दलित साहित्याच्या निर्मितीकरांना साहित्य लेखनाची परंपरा नव्हती. मुळात अक्षरांच्या दुनियेतील प्रवास करणारे त्यांच्या घरातील ते पहिलेच होते. शिक्षणामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शिकवणुकीमुळे त्यांना आत्मभान आले. पाहिलेले, भोगलेले एवढे होते की, कल्पना विलासाची गरज नव्हती. जे लिहावेसे वाटते आहे, जे लिहिले पाहिजे तेच एवढे होते की किती आणि कसे लिहावे ? एवढाच प्रश्न होता. हळुहळू साऱ्याच वाटा मोकळया झाल्या आणि साचलेले, तुंबलेले पाणी बांध फोडून वेगाने वाहू लागावे तशी अवस्था दलित लेखकांची झाली. साहित्य निर्मितीबाबतची कृत्रिम, बेगडी बंधने मोडून पडली, त्यांचे लेखनद्रव्य, त्यातील आशय, त्याची अभिव्यक्ती, भाषा हे सर्व एवढे अस्सल होते की, प्रस्थापित साहित्याच्या चौकटीत ते बसणे शक्य नव्हते, तरी ही ते जोमाने लिहू लागले. यातून दलित आत्मकथनांचा ओघ सुरू झाला"[1] आत्मकथनाच्या माध्यमातून लेखक आपल्या मनातील भावना, जीवनानुभव प्रभावीपणे मांडत असतो. दलित आत्मकथनकरांच्या जवळ जीवनानुभवाचा फार मोठा साठा होता. आपल्या वेदना प्रभावीपणे मांडण्यासाठी, आपल्यावर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी गावकुसाबाहेरील उपेक्षित जीवनाबद्दलची चीड व्यक्त करण्यासाठी दलित लेखकांनी 'आत्मकथन' हा साहित्य प्रकार हाताळला. 'आठवणीचे पक्षी', 'बलुतं', 'उपरा', 'उचल्या', 'अक्करमाशी' यासारखी वास्तववादी व महत्त्वपूर्ण आत्मकथने दलित साहित्यात लिहिली गेली. या दलित कथनकारांवर डॉ. बाबासाहेबांच्या विचारांचा फार मोठा प्रभाव होता. दया पवार यांच्या 'बलुतं' या आत्मकथनामधून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा प्रभाव जागोजागी दिसून येतो.

दगडू मारूती पवार उर्फ दया पवार यांचा जन्म इ. स. १९३५ मध्ये अहमदनगर जिल्ह्याातील धामणगाव नावाच्या खेड्याात झाला. त्यांनी संगमनेरच्या बोर्डींगमध्ये राहून आपले शिक्षण पूर्ण केले. दया पवार पद्मश्री पुरस्काराने सन्मानीत आहेत. दलित साहित्यिकांमधील एक नावाजलेले साहित्यिक म्हणून दया पवार यांना महाराष्ट्रात नव्हे तर देश ओळखतो. त्यांच्या 'बलुतं' या आत्मकथनात्मक पुस्तकाचे अनेक भारतीय भाषाबरोबरच इंग्रजी, फ्रेंच आणि जर्मन या युरोपियन भाषांत भाषांतरे झाली आहेत. त्यांनी दलित साहित्य क्षेत्रात वैविध्यपूर्ण लिखाण करून आपला वेगळा ठसा दलित साहित्यात उमटवला आहे. अशा या दलित लेखकाचे प्रभावी जीवनानुभव मांडणारे आत्मकथन म्हणजे 'बलुतं' होय.

'बलुतं' हे आत्मकथन २४ डिसेंबर १९७८ ला प्रकाशित झाले. या आत्मकथनात दया पवार यांनी दगडू पवार या आपल्यातल्याच हळुहळू विकसित होत गेलेल्या, अंतर्मनात रूतुन बसलेल्या, 'स्व' कडून विकसित झालेल्या वर्तमानातील दुसऱ्या 'स्व' ला अर्थात दया पवाराला जणू काही आपली कहाणी सांगावी तशी सांगतो आहे. 'बलुतं' मधून दलित जीवनाचे सगळे भोग भोगलेला दगडू पवार तर दलितत्वाच्या पलिकडे गेलेला कवी दया पवार जाणवतो.

'बलुतं' या आत्मकथनात दगडू पवारांच्या जीवनातील स्थित्यंतराचे चित्रण येते. त्यामुळे 'बलुतं' ही दगडू पवाराच्या स्थित्यंतराची कहाणी ठरते.

या संदर्भात बोलताना वासुदेव मुलाटे म्हणतात, " 'बलुतं' म्हणजे दगडू पवारांच्या स्थित्यंतराची कहाणी. हे स्थित्यंतर आर्थिक, शैक्षणिक, मानसिक, वैचारिक अशा विविध पातळीवरचे आहे. यातील दगडू हा महार व समाजातल्या अत्यंत निम्न स्तराला आहे, तो भित्रा व अगतिकपणे दुःख भोगणारा आहे, तर दया पवार जातीविहीन, वर्गविहीन, शांत, दूरदृष्टीचा माणूस आहे"[२] दगडू पवार हा भित्रा व अगतिक असला तरी दया पवार तसा नाही कारण त्याच्या मनावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा प्रभाव पडत चालला आहे. डॉ. बाबासाहेबांचे विचार तो आत्मसात करत जातो. त्यामुळे 'बलुतं' मध्ये जागोजागी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांमुळे आलेल्या आत्मभानांचे दर्शन घडते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीविषयीची माहिती दया पवारांना संगमनेरला शाळेत असतानाच मिळते. महार समाजाचे मास्तर पवारांना बाबासाहेबांच्या चळवळीची माहिती देतात. यावरून बाबासाहेबांचे विचार या काळात खेड्यापाड्यापर्यंत पोहचलेले दिसतात. चौथी पास झाल्यानंतर शिक्षणासाठी जेव्हा दया पवारांची आई दया पवारांना तालुक्याच्या गावी पाठवण्याचा विचार करते तेव्हा महारवाड्यातील उमा आजा दया पवारांच्या आईला सल्ला देतो की, त्याला तालुक्याला शिक्षणासाठी पाठवण्यापेक्षा गुऱ्हाकडं पाठवं, तेवढीच राखुळी यील. ती मीट-मिरचीला होईल, पोराला शिकवण्यासाठी आपण काही वानीबामण नाही. तेव्हा दया पवारांची आई उमा आजाचा सल्ला धुडकावून लावते. मुलाला शिकवावं, मोठा साहेब करावं, ही उर्मी तिला त्या काळी बाबासाहेबांच्या विचारांनी दिली आहे. कारण बाबासाहेब म्हणत, "महाराच्या बाईला मुलांसंबंधी डोहाळे कोणते लागतात ! तो प्यून व्हावा किंवा शिपाई व्हावा, पण ब्राम्हणाच्या बाईला डोहाळे लागतात, आपला मुलगा कलेक्टर व्हावा ! असे डोहाळे महार आयांना का बरं लागू नयेत?"[३] उच्च कोटीची स्वप्न पाहण्याचा मक्ता काही उच्चवर्णीयांनाच दिला नाही तर दलितांना सुध्दा तो अधिकार आहे. त्यांनी तशी स्वप्ने पाहावित आणि त्याप्रमाणे मुलांचे भवितव्य घडवावे. या बाबासाहेबांचा विचारांचा परिणाम आपल्या आईवर झाला असावा असे दया पवारांना वाटते.

बाबासाहेब आंबेडकर खेड्यापाड्यात जाऊन दलित समाजाची अस्मिता जागृत करण्याचे कार्य करत होते. बाबासाहेबांच्या क्रांतिकारक विचारांमुळे दलित समाज जागृत होत होता. महार समाजाने आपले पारंपारिक कार्य सोडून दिले होते. आता ते बाबासाहेबांच्या विचाराने प्रेरित होऊन समाजात वावरत होते. महार समाजात आलेल्या त्या जागृतीबद्दल दया पवार म्हणतात, "बाबासाहेब कोतूळ येथे येऊन गेलेले असतात. ते गाव तर माझ्या गावाच्या पलीकडे, मध्ये ढग्या डोंगर, बाबासाहेबांच्या प्रखर विचारांचा प्रभाव खेड्यापाड्यात पोहोचू लागला होता. गावोगावची महार मंडळी कातडी फाडणं, मेलेल्या गुरांचे मांस खाणं सोडीत होती. जलसाकारांची क्रांतिकारक गाणी विद्रोह पेटवीत होती. सापानं कात टाकावी तसा महार समाज सळसळत होता"[४] बाबासाहेबांच्या विचाराने समाज परिवर्तन घडत होते. समाजात सुधारणा व्हावी यासाठी बाबासाहेबांची तळमळ होती. बाबासाहेबांनी शेवग्याच्या शेंगाच्या झाडाची सांगितलेली गोष्ट महार मंडळींच्या घरोघरी पोहोचली होती. शेवग्याच्या शेंगाच्या झाडाच्या गोष्टीने महारकीच्या वतनावर झगझगीत प्रकाश टाकला होता.

जावजीबुवा आणि लक्ष्मण ही जोडगोळी, बाबासाहेबांच्या विचाराने प्रेरित झालेली, हे दोघे साऱ्या तालुक्यात समाज सुधारण्याच्या चळवळी करीत फिरत. महारांनी घाण कामं सोडावित, स्वाभिमानानं जगावं यासाठी त्याची धडपड असे. बाबासाहेबांच्या वैचारिक प्रेरणेमुळेच सवर्ण जेव्हा 'जलसा' मधील काळाराम सत्याग्रहाचा प्रसंग बंद पाडू पाहतात तेव्हा दलित एकजूटीने त्याला विरोध करतात. यात सवर्णांना माघार घ्यावी लागते. बाबासाहेबांच्या वैचारिक प्रेरणेमुळेच महार समाज मराठ्यांचा नवरदेव वेशीपाशी ओवाळणे टाळतो, गावची जत्रा वाजवणे बंद करतो, मरिआईचा गाडा एका गावाहून दुसऱ्या गावाला नेण्याचं बंद करतो. होळीच्या सणाच्या वेळी विस्तव द्यायचे नाकारतो असे अनेक प्रसंग 'बलुतं' यामध्ये येतात. 'बलुतं' मधील अशा प्रसंगा संदर्भात आपले विचार मांडताना शिवदास शिरसाठ म्हणतात, " 'बलुतं' मधल्या अनेक छोट्या-मोठ्या प्रसंगातून विचाराला प्रवृत्त करणारी शक्ती दिसून येते. तसेच आंबेडकरी विचारांचे वैचारिक अधिष्ठानही 'बलुतं' ला लाभलेले आहे"[५] आंबेडकरी विचारांचे वैचारिक अधिष्ठान बलुतं मध्ये आहे. म्हणूनच दगडू पवार हळुहळू दया पवार बनत जातो. खेड्यापाड्यातला महार समाज पारंपारिक गुलामगिरीतून मुक्त होऊन स्वाभिमानी जीवन जगू लागतो. दलित वर्गांच्या समस्या सोडवण्यासाठी बाबासाहेब रात्रीचा दिवस करत होते. दीन-दलितांची, गोर-गरीबांची समस्या मार्क्सवाद सोडवेल असे अनेकांना वाटत होते. त्यामुळे दलित साहित्यावर मार्क्सवादाचा प्रभाव आहे असे म्हटले जाते. पण दलित आत्मकथनामध्ये मार्क्सवादाचा प्रभाव फारसा दिसून येत नाही. या संदर्भात शिवदास शिरसाठ म्हणतात, "दलित आत्मकथनांचा विचार करता त्यांच्यावर 'फुले-आंबेडकरवादा' चा सर्वात जास्त प्रभाव आहे, त्या मानाने मार्क्सवादाचा फारसा प्रभाव आत्मकथनांवर नाही"[६] बाबासाहेबांचे विचार हे प्रत्यक्ष कृतीत येत होते, या विचारांना कृतिची जोड लाभल्याने दलित समाज अंतर्बाह्या चेतनामय झाला होता, याची प्रचिती 'बलुतं' मध्ये जागोजागी दिसून येते. त्यामुळेच बाबासाहेबांच्या विचारांचा प्रभाव 'बलुतं' मध्ये जागोजागी दिसून येतो.

### *संदर्भ ग्रंथ*

१.मुलाटे वासुदेव, 'दलितांची आत्मकथने', स्वरूप प्रकाशन औरंगाबाद, आवृत्ती दुसरी, एप्रिल २००३, पृ. २१-२२.
२.तत्रैव, पृ. २७.
३.पवार दया, 'बलुतं', ग्रंथाली प्रकाशन मुंबई, आवृत्ती दुसरी, पृ. ३७.
४.तत्रैव, पृ. ५७.
५.शिरसाठ शिवदास, 'दलित आत्मकथन : स्वरूप, संकल्पना व सौंदर्य', चिन्मय प्रकाशन औरंगाबाद, प्रथमावृत्ती, जानेवारी २०१५, पृ. १३८.
६.शिरसाठ शिवदास, 'दलित आत्मकथनांचा समाजशास्त्रीय अभ्यास', चिन्मय प्रकाशन औरंगाबाद, प्रथमावृत्ती, जानेवारी २०११, पृ. २५७.



*प्रा. डॉ. शकील शेख*
*प्रमुख, मराठी विभाग, सौ. सुवर्णलता गांधी महाविद्यालय, वैराग,*
*ता. बार्शी, जि. सोलापूर,*

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.org